**पुढील सरतपास अर्जदारतर्फे वकील श्री.डी.पी.केकडे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

११. नि.क्र.यु.डब्लु—१ वरील लेखी सरतपासातील सर्व मजकूर हा माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावरती माझी सही आहे.

**उलटतपास सामनेवालातर्फे वकील श्री.अजिंक्य मराठे यांचेमार्फत सुरु.**

१२. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला बॅकेमध्ये मी ब्रॅन्च मॅनेजर म्हणुन काम करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, पैशाच्या अपहाराच्या आरोपासाठी सामनेवालाने मला दि.२२/१२/२००७ रोजी आरोपपत्र बजावले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी खातेनिहाय चौकशी केल्यानंतर सामनेवाला बॅकेने मला कामावरून कमी केले. हे म्हणणे खरे आहे की, मी सामनेवाला बॅकेविरूध्द कामगार न्यायालय येथे दावा दाखल करून माझ्या कमी केलेल्या आदेशाला आव्हान दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर केसचा निकाल माझ्याविरूध्द लागला. हे म्हणणे खरे आहे की, कामगार न्यायालयाच्या निकालाविरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, सोलापूर येथे रिव्हीजन दाखल केली होती आणि ती रिव्हीजन डिसमिस झाली. हे म्हणणे खरे आहे की, मे.औद्योगिक न्यायालय, सोलापूर यांच्या निकालाविरूध्द मी कुठेही याचिका दाखल केली नाही अथवा मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मे. औद्योगिक न्यायालय, सोलापूर यांचा न्यायनिर्णय आजतागायत अस्तित्वात आहे.

१३. हे म्हणणे खरे आहे की, मी सामनेवाला बॅकेकडे उपदान मागणीसाठी अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला बॅकेने मला असे सांगितले होते की, मी अपहारासारखे नैतिक अधपतन होणारे कृत्य केल्यामुळे उपदान रक्कम मिळण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.यु—१२ ला दाखल दि. १४/०२/२०२४ च्या फॉर्म—एम च्या सामनेवाला यांनी दिलेल्या नोटीसीप्रमाणे उपदान रक्कम देता येत नसल्याबाबत सविस्तर कारण नमुद केले आहे. हे म्हणणे

*अर्ज पीजीए क्र.०८/२०२४*
*नि.क्र.यु.डब्लु—१*

खरे आहे की नैतिक अधपतनाचे कृत्य केल्यामुळे मी उपदानाची रक्कम मिळण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती

KALYANI RAJARAM ADAKE
Digitally signed by KALYANI RAJARAM ADAKE
Date: 2025.11.07 17:34:02 +0530

(क. रा. आडके)

सोलापूर.
दिनांक : ०७/११/२०२५

उपदान प्रदान अधिकारी तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सोलापूर.